


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

आजचा रंग लाल !



वर्ष : ०५ | अंक : ३९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२३ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## महाराष्ट्र ऑलिम्पिक सचिव नामदेव शिरगावकरच्या विरोधात सर्व खेळ संघटना

## नामदेव हटाव – खेळ बचाव !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, पुणे :** खेळाडूंच्या घामातुन,त्यांच्या मेहनतीतुन आणि संघर्षातून महाराष्ट्राने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावले आहे.पण दुर्दैवाने, महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे व सचिव नामदेव शिरगावकर यांच्यावर सतत भ्रष्टाचार व मनमानी कारभाराचे गंभीर आरोप होत आहेत.

संघटनांच्या निवडणुका असोत, निधीचे वाटप असो वा खेळाडूंच्या हक्कांचा प्रश्न सर्वत्र केवळ स्वतःच्या फायद्याचा व गटबाजीचा कारभार सुरू आहे. खेळाडूंच्या प्रगतीपेक्षा खुर्ची व सत्ता टिकवणे हाच मुख्य उद्देश दिसतो.त्यामुळेच महाराष्ट्रातील अनेक क्रीडा संघटना व खेळाडू अत्यंत नाराज व संतप्त झालेले आहेत.तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई हि अधिकृत संघटना असून.तायक्वॉंदो संघटनेत दोन ग्रूप करून त्यांच्यात भांडणे नामदेव शिरगावकर यांनी लावली. राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष, माजी खासदार रामदासभाऊ तडस यांच्या नेतृत्वाखाली एक भव्य आंदोलन उभारले जात आहे.

यामध्ये पै.संदीप आप्पा भोंडवे यांचे आमरण उपोषण होणार असून, या लढ्याला हजारो खेळाडू व क्रीडा संघटनांचा पाठिंबा लाभणार आहे.

आंदोलनाची ठळक माहिती:
दिनांक : २३ सप्टेंबर २०२५
वेळ : सकाळी १०.०० वा.
स्थळ : बंड गार्डन पोलीस स्टेशन, पुणे

महाराष्ट्रातील प्रत्येक खेळाडू, प्रशिक्षक, संघटक आणि क्रीडाप्रेमी यांना आवाहन आहे की – आज जर भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवला नाही,तर उद्या आपल्या खेळाडूंचे भविष्य कायमचे अंधारात जाईल.

## राज्य सरकारचा मोठा निर्णय !

### अखेर शनी शिंगणापूरमधील शनैश्वर देवस्थान ट्रस्ट बरखास्त

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, अहिल्यानगर :** शनी शिंगणापूर येथील देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त मंडळ अखरे बरखास्त करण्यात आले. हे देवस्थान राज्य सरकारचता अख्त्यारीत आणण्यासाठी २०१८ मध्ये करण्यात आलेला कायदा २२ सप्टेंबर २०२५ पासून लागू करण्यात आला. त्यानुसार आता सरकार कडून नवे विश्वस्त मंडळ नियुक्त केले जाईल. तोपर्यंत कारभार पाहण्यासाठी अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या संबंधिचा शासन निर्णय सोमवारी जारी करण्यात आला. शनी शिंगणापूरमध्ये फटाके फोडून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे.

गेल्या काही काळापासून या देवस्थानचा कारभार वादात सापडला होता. चौथरावर महिलांना प्रवेश वाद, मुस्लिम कर्मचारी नियुक्ती वाद, कोट्यवधी रुपयांचा ऑनलाईन दर्शन घोटाळा अशा घटना घडल्या होत्या. पावसाळी अधिवेशनमध्ये हा मुद्दा गजला. तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विश्वस्त मंडळ बरखास्त करण्याची घोषणा केली होती. त्याची आता अंमलाबजावणी झाली.

**सरकारच्या जीआरमध्ये काय म्हटलं आहे?**

श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्त मंडळाच्या व्यवस्थापनाखाली असताना, देवस्थानच्या प्रशासनात विविध प्रकारच्या अनियमितता, बनावट ॲप्स संदर्भातील घोटाळा, आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार, देवस्थानातील हिंदू व मुस्लिम धर्मीय कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेली वैमनस्यपूर्ण परिस्थिती, श्री शनिदेवाचे चौथऱ्यावरुन वाद, यावरुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, तसेच देवस्थानचे उप कार्यकारी अधिकारी यांच्या आत्महत्येसारख्या अत्यंत गंभीर घटना शासनाच्या निदर्शनास आलेल्या आहेत.

अशा गंभीर बाबींमुळे देवस्थानच्या कार्यप्रणालीबाबत सर्वसामान्य भाविकांमध्ये अस्वस्थता व तीव्र रोष निर्माण होऊन, देवस्थानावरील त्यांचा विश्वास डळमळीत झालेला आहे. त्यामुळे, भाविकांचा विश्वास अबाधित राखण्यासाठी, देवस्थानच्या प्रशासनात सुसूत्रता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने सदर अधिनियमाची अंमलबजावणी करणे आवश्यक होते. त्यासाठी श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) अधिनियम, २०१८ दि.२२.०९.२०२५ रोजी पासून लागू करण्यात आला आहे.

## चाळीतच सडला उन्हाळ कांदा ! शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, सिन्नर :** समाधानकारक दर मिळण्याच्या अपेक्षेन सिन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांनी चाळीत साठवून ठेवलेल्या उन्हाळ कांद्याला मोड फुटले आहेत. काही ठिकाणी हा कांदा सडल्यामुळे शेतकऱ्यांना तो रस्त्यावर फेकून द्यावा लागला. साहजिकच शेतकऱ्यांना लाखो रुपयांचे नुकसान सहन करावे लागले. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या धोरणाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

उन्हाळ कांदा बाजारात आल्यापासून वर्षभरात शेतकऱ्यांना समाधानकारक दर मिळाला नाही. त्यामुळे आताच भाव वाढेल, मगच भाव वाढेल याअपेक्षेत शेतकरी कायम राहिला. त्याने अनेकदा चाळीत साठवून ठेवलेल्या कांद्याची निवड केली. मात्र,आता पावसाळी हवामानाचा शेतकऱ्यांना फटका बसला असून, साठवलेल्या कांद्याला चाळीतच मोड फुटले आहेत. याशिवाय अनेक शेतकऱ्यांच्या कांदा चाळीत सडून गेल्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. ठाणगावातील राजेंद्र उघडे यांनी चाळीत सडलेला कांदा रस्त्यावर फेकून दिला, तर पाडळी येथील तानाजी रेवगडे आणि किशोर शिंदे यांच्या कांद्याला चाळीतच मोड फुटल्यामुळे आणि सडल्यामुळे त्यांच्याही मेहनतीवर पाणी फिरले गेले आहे.

# धाराशिवमध्ये महापूर !



## ९२ गावे पुराच्या विळख्यात, शेतीपिकांचे प्रचंड नुकसान

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, धाराशिव :** गेल्या तीन दिवसांपासून धाराशिव जिल्ह्यातील उमरगा, भूम व परांडा तालुक्यात झालेल्या विक्रमी अतिवृष्टीमुळे महापूराची भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेषतः परंडा व भूम तालुक्यात पूरस्थिती गंभीर बनली असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. ९२ गावे बाधित होऊन ६२ हजार ९८९ हेक्टर क्षेत्रातील शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

**बचावकार्य वेगाने सुरू !**

पूरग्रस्त भागात भारतीय लष्कर, एनडीआरएफ व एसडीआरएफचे जवान दाखल झाले आहेत. हेलिकॉप्टर व बोटींच्या साहाय्याने बचावकार्य सुरू आहे. आतापर्यंत जिल्ह्यात एकूण ६५ नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. तर लाखो गावांतील १२ जणांना बोटीने, रुई येथील १३ जणांना बोटीने, वडनेर-देवगाव (खु.) येथील २६ जणांना हेलिकॉप्टरने, भूम तालुक्यातील तांबेवाडीतील ६, इट येथील १ व इडा येथील ७ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे. परंडा तालुक्यातील घाटपिंपरी,वागेगव्हाण व वडनेर परिसरात सुमारे १५० नागरिकांची जवानांनी सुटका केली. देवगाव (खु.) येथे परंडाचे आमदार तानाजी सावंत यांनी आज भेट देऊन पूरपरिस्थितीची पाहणी करून नुकसानीचा आढावा घेतला.

**प्रशासन सज्ज !**

जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार हे पूरग्रस्त भागात असून यंत्रणांना सज्ज राहण्याचे निर्देश त्यांनी दिले आहे. भूम उपविभागीय अधिकारी रैवैयाह डोंगरे, तहसीलदार निलेश काकडे यांच्यासह महसूल, पोलीस व आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत आहे. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी पूरग्रस्त भागात तातडीने मदत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ते पूरग्रस्त भागातील गावात पाहणी करत आहेत.

**शेतीपिकांचे मोठे नुकसान !**

२० ते २२ सप्टेंबर या कालावधीत झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातील ६४ हजार २९ शेतकऱ्यांचे पीके बाधित झाली आहेत. यात प्रामुख्याने जिरायत पिके तर काही प्रमाणात बागायती पिकांनाही फटका बसला आहे.

**पाझर तलाव फुटले !**

भूम तालुक्यातील अतिवृष्टीमुळे अनेक पाझर तलाव फुटले असून वारेवडगाव, पाठसांगवी, हिवरडा, वालवड चुंबळी, मोहिते नगर वालवड व वालवड पाझर तलाव बाधित झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

**हवामान विभागाचा इशारा !**

हवामान विभागाने पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता वर्तवली आहे. नदीकाठच्या नागरिकांनी जनावरे व कुटुंबियांसह सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## धनोजे कुणबी समाज मुलींच्या वसतिगृह जागा मंजुरीचे आश्वासन !

### बावनकुळे यांची समाज मंडळाचे अध्यक्ष श्रीधर मालेकर यांच्या निवासस्थानी बैठक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** धनोजे कुणबी समाज हा मोठ्या संख्येने असून मुख्य व्यवसाय शेती आहे. शेतकऱ्यांच्या मुलींना उच्च शिक्षणाची सोय व्हावी व त्यांना चंद्रपूरसारख्या शहरात राहता यावे म्हणून समाजाने होतकरू मुलींसाठी वसतिगृह निर्माण करावे.

त्यासाठी उपलब्ध असलेल्या जागेला अवश्य मंजुरी देऊ, असे आश्वासन महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्थानिक तुकूमस्थित गोपाळनगर येथील धनोजे कुणबी समाज मंदिराचे अध्यक्ष श्रीधर मालेकर यांच्या निवासस्थानी समाजबांधव बैठकीत व्यक्त केले. यासंदर्भातील प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे त्वरित सादर करावा, असेही त्यांना सांगितले. यावेळी आ. किशोर जोरगेवार, शहर भाजपाध्यक्ष सुभाष कासनगोट्टुवार, माजी आमदार सुधाकर कोहळे व मान्यवर मंडळी उपस्थित होती. समाज मंदिराचे अध्यक्ष श्रीधर मालेकर यांनी समाजाच्या आजपर्यंतच्या कार्यावर प्रकाश टाकून आ. जोरगेवार यांनी समाजासाठी वाचनालय निर्मिती करून दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. लवकरच जागेबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे कार्यवाही करू असेही मालेकर म्हणाले.

बैठकीला समाज मंडळाचे उपाध्यक्ष संजय ढवस, सचिव अतुल देऊळकर, सहसचिव नामदेव मोरे, सदस्य रवींद्र झाडे, मंजुषा मोरे, मनिषा बोबडे, इंजि. अरविंद मुसळे, इंजि. प्रभाकर दिवसे, ओबीसी महासंघाचे सचिव सचिन राजुरकर, प्रभाकर पारखी, भाऊराव झाडे, सरदार पावडे, अरुण मालेकर, अरुण देऊळकर, गणपत हिंगाणे, अँड. विलास माथनकर, दिलीप मोरे, विनोद पिंपळशेंडे, रणजित डवरे, पंडित पारोधे, प्रा. सुरेश लोहे, अजय जयस्वाल, संगिता मालेकर, शैला मालेकर, माधुरी मालेकर नेहा लांबाडे, प्राची मालेकर, विनोद मालेकर, डॉ. शिवम सातपुते, रवींद्र टोंगे आदी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन नामदेव मोरे यांनी केले.

# संपादकीय



## राहुल गांधींचे मिशन गुजरात

बिहारमधील ‘मतदार अधिकार यात्रा’ झाल्यानंतर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अलीकडेच थेट गुजरात गाठले. निमित्त होते काँग्रेसचे प्रेरणाधाम कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर. ‘काँग्रेस २०२७च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला हरवणार’, हा पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत लोकसभेत व्यक्त केलेला निर्धार आपण विसरणार नसल्याचे राहुल यांनी स्पष्ट केले.

गेल्या सहा महिन्यांत ते किमान पाचव्यांदा गुजरातला पोहोचले. विशेष मतपडताळणी (एसआयआर) व मतचोरी या विषयांची आपली ‘लाइन’ संसदेपासून बिहार व पुढे गुजरातपर्यंत वाढवताना, तेथील शिबिरातही ‘वोट चोर, गद्दी छोड’ अशी घोषणा देण्यास राहुल गांधी विसरले नाहीत. पंतप्रधान मोदी यांना लक्ष्य करण्यासाठी काँग्रेसच्या भात्यातील आणखी एक बाण, असे वर्णन केल्या जाणाऱ्या या मुद्द्यावर निवडणूक आयोगानंतर आता माध्यमेदेखील राहुल गांधी यांचे लक्ष्य असल्याचे दिसते.

गुजरात काँग्रेसच्या शहर आणि जिल्हाध्यक्षांसाठी १० ते १९ सप्टेंबर दरम्यानच्या १० दिवसांच्या प्रशिक्षण शिबिराच्या निमित्ताने पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे व राहुल गांधी यांनीही राज्य काँग्रेसमध्ये असलेला नेतृत्वाचा अभाव स्वीकारला आहे. अर्थात हे दोन ‘गुजरातचे लोक’ देशाला कमकुवत करत आहेत, हे खर्गे यांचे व्यक्तिगत मत असावे! भाजपच्या या बालेकिल्ल्यात भाजप नेते तुमच्याबाबत काहीही सांगत असले तरी तुम्ही शांत रहावे; उर्वरित मार्ग सहज सापडेल, हा राहुल यांचा तर्क नव्या चर्चेला जन्म देणारा ठरावा. आत्ताच्या भाजपला देशभरातून हद्दपार करायचे असेल, तर त्याचा आरंभबिंदू गुजरात हाच असणार, हा राहुल गांधी यांचा विश्वास बिलकूल अनाठायी नाही.

१९९५मध्ये भाजपने पहिल्यांदाच गुजरातमध्ये सत्ता काबीज केली. त्यानंतरच्या सलग सात विधानसभा निवडणुकांत काँग्रेसचा पराभव झाला; पण इतका दीर्घ काळ सत्तेबाहेर राहिल्यानंतरही काँग्रेसची पाळेमुळे गुजरातच्या मातीत घट्ट राहिली. कारण मुळात हा प्रांत ‘महागुजरात’च! राहुल गांधींच्या ताज्या गुजरात दौऱ्यांमुळे काँग्रेसच्या केडरमध्ये नवी आशा, नवा उत्साह निर्माण झाला असणार. तरीही काँग्रेसचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आणखी सक्रिय धोरणात्मक पावले उचलणे आवश्यक आहे. दिल्लीत इंदिरा भवनात स्वस्थ बसून ‘राहुल गांधी यांनीच सारे काही करावे’, अशा वृत्तीतून, ट्विट-ट्विट खेळणाऱ्यांवर भिस्त टाकून हे मिशन गुजरात फत्ते करता येणार नाही, याची जाणीव गांधी मायलेकांना असणारच! आजच्या काळात कर्मण्येवाधिकारस्ते या भावनेने कोणीही काम करत नाही आणि राजकारणात तर नाहीच नाही.

सापुतारा हे पर्यटनस्थळ ज्या राज्यात वसते तो गुजरात भाजपकडून परत मिळवायचा असेल तर तेथे ‘राजकीय पर्यटना’चा काही उपयोग नाही, हेही त्यांच्या लक्षात आलेच असणार. राहुल गांधी यांनी सहा महिन्यांपूर्वी, मार्चमध्ये संघटना निर्मिती मोहीम सुरू करून, आपण गुजरातकडे अतिशय गांभीर्याने बघत आहोत, हे दाखवून दिले होते. त्यांच्या मते गुजरातमध्ये काँग्रेसच्या नेतृत्वात दोन प्रकारचे लोक आहेत; एक म्हणजे जे जनतेसोबत उभे राहतात, त्यांच्या हृदयात काँग्रेसची विचारसरणी आहेत ते. आणि दुसरे, जे जनतेपासून तुटलेले आहेत. त्यातलेही अर्धे प्रदेश काँग्रेस नेते (आतून) भाजपला मिळालेले आहेत; परंतु अशांपैकी कारवाई कोणाकोणावर झाली, हे गुलदस्त्यात आहे. आणि ‘तसे’ नेते शोधायला राहुल यांना दिल्लीतून गुजरातेत कशाला जायला हवे!

# मानहानीचे मानकरी..!!



....भारत-पाकिस्तान या दोन्ही संघात क्रिकेटच्या स्टेडियममध्ये होणारी लढत ही सीमेवरील संघर्षासारखीच तीव्र असते. एखादा सैनिक हातात रायफल घेऊन रणांगणात उतरतो, त्याचप्रमाणे कोट्यवधी जनतेच्या अपेक्षांचे ओझे खांद्यावर घेऊन दोन्ही संघ ही लढत खेळायला मैदानात उतरत असतात. प्रत्येक लढतीत भारताने पाकिस्तानला चारीमुंड्या चीत करावे अशी तमाम देशवासीयांची अपेक्षा असते. लढत जसजशी पुढे सरकू लागते, तसतसे स्टेडियममध्ये, घराघरांत टीव्हीपुढे बसून सामना बघणाऱ्या कोट्यवधी प्रेक्षकांचे रक्तही उसळू लागलेले असते. लढतीत कधी भारताचे पारडे जड तर कधी पाकिस्ताने पारडे जड होताच प्रेक्षकांच्या हृदयाचे ठोकेही धडधडू लागतात. संपूर्ण स्पर्धेतला हा एकमेव सामना असतो जिथे खेळाडूंना आपल्या कौशल्यापेक्षा आक्रमकतेवर जास्त भार द्यावा लागतो. कधीकाळी भारत-पाकिस्तान हे दोन्ही संघ तुल्यबळ असताना असे चुरशीचे अनेक सामने बघायला मिळायचे. परंतु आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. क्रिकेटच्या मैदानात भारताला कडवे आव्हान देण्याची भाषा करणाऱ्या पाकिस्तानी संघाच्या आता फक्त तोंडातच बळ उरले आहे. याचे प्रत्यंतर सध्या यूएईत सुरू असलेल्या आशिया चषकात पावलोपावली दिसून येत आहे.

भारत-पाकिस्तान हे एकमेकांचे कट्टर प्रतिस्पर्धी गेल्या आठवड्यात आशिया चषकात आमने-सामने आले होते. मात्र, या सामन्याला रंजकतेपेक्षा जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याची किनार होती. गल्ली क्रिकेट खेळणाऱ्या लिंबूटिंबू संघाला त्यांची जागा दाखवून द्यावी त्याप्रमाणे चॅम्पियन टीम इंडियाने या सामन्यात पाकिस्तानी संघाला पराभवाची धूळ चारली. एवढेच नाही तर, कर्णधार सूर्यकुमार यादव याच्यासह संपूर्ण भारतीय संघाने आपला करारी बाणा दाखवत पाकिस्तानचा कर्णधार सलमान आगा आणि इतर पाक खेळाडूंशी हस्तांदोलन करण्याचे टाळले. या प्रकारामुळे क्रिकेट जगतात पाकिस्तानची प्रचंड मानहानी झाली. या मानहानीचा धक्का जिव्हारी लागलेला पाकिस्तानचा संघ अजूनही त्यातून बाहेर येऊ शकलेला नाही. सामन्याच्या सुरुवातीलाच टॉस उडवताना सूर्यकुमार यादव हाताची घडी घालून उभा होता. यावेळी त्याने पाकच्या कर्णधाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. यानंतर खेळलेल्या संपूर्ण सामन्यात भारतीय संघाचाच वरचष्मा दिसून आला. आधी मैदानात आणि सामना संपल्यावर ड्रेसिंग रुममध्ये परतताना भारतीय संघाने आत्मविश्वास व कौशल्याचा अभाव असलेल्या पाकच्या संघाला त्यांची जागा दाखवून दिली. रागाने लाल झालेला पाकिस्तानी संघ सध्या या अपमानाचा बदला घेण्याचा हरत-हेने प्रयत्न करतोय, परंतु अद्याप तरी त्याला यश आलेले नाही. कोड ऑफ कंडक्टनुसार त्या सामन्याचे सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांनी भारतीय संघ आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांना दंड आकारून कारवाई करण्याची गरज होती. परंतु पायक्रॉफ्ट यांनी तसे न केल्याने त्यांच्यावरच कारवाई करावी, अशी मागणी पाकिस्तानी संघाने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) केली. परंतु ही मागणी करताना सध्या आयसीसीचा बॉस कोण आहे, हे कदाचित पाकचे मठ्ठ व्यवस्थापन विसरले असावे. आयसीसी चेअरमन जय शहा यांनी पाकच्या मागणीला जराही भीक घातली नाही. त्यानंतर पाकिस्तानने थेट स्पर्धेवरच बहिष्कार टाकण्याची धमकी दिली. आशिया चषकाचे आयोजनकर्ते युनायटेड अरब अमिरात असले, तरी ही स्पर्धा यावेळी पाकिस्तानात होणार होती. परंतु भारताने पाकिस्तानात खेळण्यास नकार दिल्याने ही स्पर्धा यूएईत खेळवण्यात येत आहे. याआधी पाकिस्तानने चॅम्पियन्स ट्रॉफी आयोजित करूनही भारताने प्रत्येक सामने यूएईत खेळत पाकच्या नाकावर टिच्चून ही स्पर्धा जिंकून दाखवली होती. भारताने पाकिस्तानमध्ये सामने खेळावेत यासाठी पाकने खूप विनंत्या अर्ज केले,



**कव्हर स्टोरी**

**- शिवाजी विठ्ठल चौगुले. कागल-कोल्हापूर..**

तेव्हाही त्यांनी बहिष्काराची धमकी दिली होती. परंतु भारताच्या ताठ बाण्यापुढे त्यांची डाळ शिजू शकली नाही. भारत पाकिस्तानात न गेल्यामुळे पाकला प्रचंड नुकसान सहन करावे लागले. या स्पर्धेसाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने स्टेडियमच्या उभारणीसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले होते. हा खर्च या स्पर्धेतून भरून न निघाल्यामुळे सध्या पाक क्रिकेट बोर्डाची अवस्था दिवाळखोरीत गेल्यासारखी झालेली आहे. त्यातच स्पर्धा सुरू असताना आशिया चषकातून माघार घेतल्यास मोठ्या दंडाला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे पाकच्या संघाने यूएईच्या सामन्याआधी बहिष्काराची नौटंकी केली आणि तासाभराने सामना खेळायला ते मैदानात उतरले.

आयसीसीने आशिया चषकातील उर्वरित सामन्यांमधून सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांना हटवण्याची पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची मागणी स्पष्ट शब्दात फेटाळून लावली आहे. आशियाई क्रिकेट परिषदेच्या अधिकाऱ्यांना ज्यामध्ये पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या संचालकांचाही समावेश होता, त्यांना दोन्ही संघांचे कर्णधार सामन्यानंतर हस्तांदोलन करणार नाहीत याची आधीच कल्पना होती. तरीही, पाक क्रिकेट बोर्डाचे प्रमुख मोहसिन नक्वी, माजी क्रिकेटपटू रमीझ राजा यांनी या प्रकरणावरून वाद निर्माण केला. परंतु आयसीसीच्या दणक्यानंतर आता पाक बोर्डाने आपला मोर्चा सूर्यकुमार यादवकडे वळवला आहे. सामना झाल्यानंतरच्या पत्रकार परिषदेत हा सामना आम्ही पहलगामच्या हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना समर्पित करत असल्याचे वक्तव्य सूर्यकुमारने केले होते. या वक्तव्याने पाकच्या बुडाला चांगल्याच मिरच्या झोंबल्या आहेत. त्यामुळे किमान सूर्यकुमारला दंड तरी करा अशा पाकच्या कु कुचाळक्या सुरू आहेत. आम्ही मैदानात स्पोर्टमनश् स्पिरिट दाखवतो, खेळभावनेने मैत्रीचा हात पुढे करतो आणि भारत जाणीवपूर्वक खेळाच्या मैदानात राजकीय विषय आणून वातावरण खराब करत असल्याची रडकथा पाक गात आहे. खरे तर ही फक्त झाँकी आहे, अजून खूप मानहानी व्हायची बाकी आहे. रविवारी सुपर फोर फेरीत भारत-पाक पुन्हा आमने-सामने येतील. तेव्हा भारताला मैदानात हरवण्याचा विचार दूरचीच बात, पाकच्या संघाने नवीन अपमान गिळण्याच्या तयारीत रहावे हे नक्की...!!

# वैविध्यपूर्ण अभियानाचा गौरव !!

यावर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार दक्षिण भारतातील लोकप्रिय ज्येष्ठ अभिनेते मोहनलाल यांना जाहीर करण्यात आला आहे. अलिकडेच, भारत सरकारने २०२३च्या दादासाहेब फाळके पुरस्कारासाठी नामांकन जाहीर केली होते. त्यानंतर मोहनलाल यांच्या नावाची सरकारतर्फे घोषणा करण्यात आली. दादासाहेब फाळके पुरस्कार निवड समितीच्या शिफारशीनुसार ही घोषणा करण्यात आली. हा पुरस्कार भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार मानला जातो. अभिनेते मोहनलाल यांना आज म्हणजे २३ सप्टेंबर २०२५ रोजी ७१व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये हा पुरस्कार प्रदान केला जाईल.




दक्षिण भारताने भारतीय मनोरंजन विश्वाला अनेक महान कलाकार दिले त्यातीलच एक म्हणजे मोहनलाल. २१ मे १९६० रोजी केरळातील एलनथूर येथे येथे जन्मलेले मोहनलाल यांचे पूर्ण मोहनलाल विश्वनाथ नायर असे आहे. शालेय वयापासूनच अभिनयाची आवड असलेल्या मोहनलाल यांनी १९७८ साली थिरनोत्तम या मल्याळम चित्रपटातून चित्रपटसृष्टीत प्रवेश केला मात्र हा चित्रपट प्रदर्शित होऊ शकला नाही त्यामुळे १९८० साली प्रदर्शित झालेला मंजिल विरिंजा पुक्कल हा त्यांचा पहिला प्रदर्शित चित्रपट ठरला. विशेष म्हणजे या चित्रपटात त्यांनी नायकाची नाही तर खलनायकाची भूमिका केली मात्र ही भूमिका त्यांनी अशाप्रकारे वठवली की नायकापेक्षा त्यांनी साकारलेला खलनायकच भाव खाऊन गेला. हा चित्रपट त्यांच्यामुळेच हिट झाला. याच भूमिकेने त्यांना चित्रपटसृष्टीचे कवाडे उघडून दिले. या चित्रपटाद्वारे मल्याळम चित्रपट सृष्टीला नवा ताकदीचा अभिनेता मिळाला. हा चित्रपट त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. त्यांच्या घरासमोर निर्माते दिग्दर्शकाच्या रांगा लागल्या. त्यांचे चित्रपट एकापाठोपाठ हिट होऊ लागले. यशस्वी चित्रपटांची मालिकाच त्यांनी सुरू केली. दर पंधरा दिवसांनी त्यांचा एक चित्रपट प्रदर्शित होऊ लागला. विशेष म्हणजे सलग चित्रपट प्रदर्शित होऊनही प्रेक्षकांनी त्यांच्या चित्रपटाकडे पाठ फिरवली नाही कारण प्रत्येक चित्रपटात त्यांनी वेगवेगळी भूमिका साकारली. अभिनयातील वैविध्यामुळे ते आपली लोकप्रियता टिकवून ठेवू शकले. राजविंटे माकन या चित्रपटात त्यांनी साकारलेली डॉनची भूमिका त्यांचा कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. या चित्रपटानंतर त्यांची लोकप्रियता गगनाला भिडली. पुलीमुर्गम हा त्यांनी अभिनय केलेला चित्रपट तर सुपरहिट ठरला. हा चित्रपट त्याकाळात सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला. या चित्रपटाने त्या काळात १३० कोटी रुपयांची कमाई केली. दृश्यम या चित्रपटातील त्यांची भूमिका देखील लक्षवेधक ठरली. हा चित्रपट नंतर हिंदीतही आला ज्यात मोहनलाल यांची भूमिका अजय देवगण यांनी केली. अभिनयासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयाच्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी तर त्यांना नऊ वेळा नामांकन मिळाले त्यापैकी ४ वेळा त्यांना हा पुरस्कार मिळाला. वानप्रस्थम या चित्रपटात त्यांनी कथकली नृत्य सादर करणाऱ्या कलाकाराची भूमिका साकारली. या चित्रपटातील त्यांच्या अभिनयासाठी त्यांना पहिल्यांदा सर्वोत्कृष्ट अभिनयाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांनी जवळपास ३०० पेक्षा अधिक मल्याळम चित्रपटात भूमिका केल्या. केवळ मल्याळम नाही तर हिंदीसह अन्य दक्षिण भाषीय चित्रपटातही त्यांनी भूमिका केल्या. दक्षिणेतील इतर अभिनेत्यांप्रमाणे त्यांचेही हजारो फॅन्कलब आहेत. परदेशातही त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. जवळपास चाळीस वर्षांहून अधिक काळ अभिनय क्षेत्रात घालवलेल्या मोहनलाल यांना भारत सरकारने पद्मश्री सारखा मानाचा पुरस्कार देऊनही गौरविले आहे. आता दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरवून सरकारने त्यांच्या वैविध्यपूर्ण अभिनय कारकिर्दीचा योग्य गौरव केला आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनेते मोहनलाल यांचे मनापासून अभिनंदन!



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

# जोगेश्वरीत संभाजी महाराजांचा इतिहास उलगडला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, मुंबई :** ऊत्तर पश्चिम जिल्हा खासदार अर्बन डेव्हलपमेंट ऑफ इंडिया सदस्य रवींद्र दत्ताराम वायकर यांच्या संकल्पनेतून व त्यांच्या पत्नी मनीषा वायकर समाजसेविका यांच्या सहकार्याने जोगेश्वरीमध्ये धर्मवीर संभाजी महाराज यांचे संपूर्ण आयुष्य त्यांचा संपूर्ण केलेला त्याग व तो प्रत्यक्षात जोगेश्वरी मध्ये उतरवण्याचे प्रचंड ताकतीचे काम व या कलीयुगात ज्याची गरज लागते ते बरोबर हेरून आपल्या दूरदृष्टीने खासदार यांनी प्रत्यक्षात कृतीत आणले आहे.

एकनिष्ठ ताकद, प्रामाणिकपणा आपल्या धर्माबद्दल चा आदर लोकांबद्दलचा आदर



याचे प्रत्यक्ष उदाहरण मांडण्यात आले धर्मवीर संभाजी महाराज म्हणजे काय होते हे सगळ्याला वाचून त्यांचा इतिहास माहित आहे.

पण तो इतिहास आचरणात आणण्याचे काम या युगातील व या देशातील महाराष्ट्रातील जनता करत नाही व हे काम त्यांच्या डोळ्यासमोर प्रत्यक्षात २४ तास राहावे व त्यांचा आचरण करून आपलं आयुष्य सोनेरी करावं अशा प्रकारची कल्पना महाराष्ट्रातील शिवछत्रपतीच्या एका मावळ्याने आपली जबाबदारी ओळखून ती पुरी केली आहे. या जबाबदारीला जोगेश्वरी मुंबई महाराष्ट्र हिंदुस्तान या सर्व जनतेने दात दिली पाहिजे प्रत्यक्ष मराठी मराठी मराठी यांनी पक्षाचा विचार न करता अशा कृत्या आपल्यासाठी जो करतो त्याचा व धर्मवीर संभाजी महाराजयांचा केलेले कामाचा विचार करून त्याप्रमाणे वागावे त्याचा आदर करावा ही काळाची गरज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा मावळा म्हणून रविंद्र दत्ताराम वायकर यांनी करून दाखवलेली आहे.

## ब्रह्मचारिणी..

नवरात्री महोत्सवात
द्वितीयमाळ अर्पिली
ब्रह्मचारिणी रूपात
चराचरा ती व्यापली

डाव्याहाती कमंडलू
उजव्या माळ धरली
घनघोर तपश्चर्या ती
उमामाते स्विकारली

बेल पत्री खाई फक्त
अपर्णा नामे शोभली
पति रूपे अंतिमता
शंकर कृपा लाभली

साक्षात वैराग्य मुर्ती
जपा तपा ती रंगली
श्रध्दाअन् भक्तीभाव
श्रीशंभो रसा दंगली

तप कठोर करी तरी
भक्ता त्वरीत पावली
आर्त हाक भक्त देता
मा तात्काळ धावली

दूध साखर प्रिय तुला
देतेस निवांत सावली
ज्योतिर्मय स्वरूप तव
अंतःकरणास भावली

**– हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## त्र्यंबकेश्वर येथील पत्रकारांवरील भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ शहापूरमध्ये निषेध आंदोलन



**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.२२, शहापूर (ठाणे) :** नाशिक येथील त्र्यंबकेश्वर येथे साधू महंतांच्या बैठकीच्या नियोजनाचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या तीन पत्रकारांना गावगुंडांकडून झालेल्या बेदम मारहाण प्रकरणाचे तीव्र पडसाद शहापुरात उमटले आहेत. पत्रकारांवर झालेल्या या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ शहापूर संघर्ष पत्रकार संघाच्या वतीने शिवतीर्थावर आयोजित केलेल्या निषेध आंदोलनात तालुक्यातील बहुतांश पत्रकार संघटनांनी सहभागी होत. सर्व पत्रकारांनी काळ्या भीती लावून या गंभीर घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला. यावेळी पत्रकार एकजुटीचा विजय असो, पत्रकारांना मारहाण करणाऱ्या गाव गुंडांना तात्काळ अटक करावी, पत्रकार संरक्षण कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी अशा घोषणा देण्यात आल्या. तसेच आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन पोलीस प्रशासन व तहसीलदार यांना देण्यात आले. दरम्यान लोकशाहीचा चौथा स्तंभ असुरक्षित असल्याची भावना तालुक्यातील विविध पत्रकार संघाच्या सदस्यांनी निषेध करत व्यक्त केली आहे. या आंदोलनाला संघर्ष पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष योगेश हजारे, तालुकाध्यक्ष विठ्ठल धारवणे, दिलीप वरकुटे, रमेश भेरे, रविंद्र लकडे, अंकुश सातपुते, अनिल शेट्ये, रविंद्र खाडे, भगवान फर्डे, वामन केदार, अंकुश भोईर, दीपक चंदे, किरणकुमार थोरात, दिनेश पाचघरे, रवींद्र गोतारने, संजय भालेराव, हुसेन शेख, काळूराम भोईर, दिनेश कांबळे, अनंत बोरसे, अशा पडवळ, लता गगे, सुनील फर्डे, सोमनाथ शिर्के, निलेश विशे, प्रसाद भोईर, दिनेश गायकर, सुनील केदारे, रमेश घावट, रवींद्र बोंद्रे, संजय फर्डे आदींसह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे नुकसान; कृषी प्रशासनाला निवेदन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील खडकवाडी, पळशी, पोखरी, म्हसोबा झाप, वडगाव सावताळ, वासुंदे आणि टाकळी ढोकेश्वर या भागांत यंदा अतिपावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या परिसरात कांदा, बाजरी, मिरची, वटाणा, काकडी आणि फूलशेती यासारखी पिके घेतली जातात. परंतु, सततच्या मुसळधार पावसामुळे शेतात गुडघाभर पाणी साचले असून, पिकांचा पूर्णपणे नाश झाला आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई आणि शासकीय मदत मिळावी. यासाठी सामाजिक कार्यकर्ते बजरंग गागरे आणि निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुका उपाध्यक्ष रवींद्र राजदेव यांनी पारनेर येथील कृषी विभागाला निवेदन दिले आहे. त्यांनी नुकसानग्रस्त पिकांचे तात्काळ पंचनामे करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळेल. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतात पाणी साचल्याने कांदा, बाजरी, मिरची यासारखी पिके उद्ध्वस्त झाली आहेत. शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. शासनाने त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी. शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी शासकीय मदत तातडीने मिळणे आवश्यक आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढत राहू आणि त्यांना न्याय मिळवून देऊ. असे मत सामाजिक कार्यकर्ते बजरंग गागरे यांनी व्यक्त केले आहे. यावेळी बबन रोकडे, ढोकळे गुरुजी, युवा नेते विशाल गागरे आदी उपस्थित होते. प्रशासन या मागणीला कसा प्रतिसाद देईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## कळंब तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा - गोरे यांची मागणी



**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.२२, धाराशिव :** धाराशिव जिल्ह्यासह कळंब तालुक्यात काही दिवसापासून सुरू असलेल्या सततच्या ढगफुटी सदृश्य व अतिवृष्टी पावसामुळे शेतकऱ्यांचे शेतातील पिकांचे अतोनात नुकसान झाले असून अद्याप ही पाऊस दररोज सुरूच असल्याने शेतकऱ्यांचे यामध्ये मोठे नुकसान होत आहे. यामध्ये सोयाबीन, उडीद, मूग, कांदा,ऊस यासह इतर पिकांचे नुकसान झाले असल्यामुळे तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी बब्रुवान गोरे यांनी दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी तहसीलदार यांना निवेदन देऊन मागणी केली आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, त्यामुळे तात्काळ शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा कारण शेतकरी अगोदरच कर्जबाजारी आहे व अतिवृष्टीमुळे आणखीनच अडचणीत सापडला असल्याने संपूर्ण उद्ध्वस्त झाल्याची परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, तसेच शेतकऱ्यांच्या पिकाच्या नुकसानीची भरपाई तात्काळ देण्यात यावी, नदीच्या पुरामुळे मृत्यू पावलेल्या जनावरांची आर्थिक मदत शेतकऱ्यांना देण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे. सदर निवेदनावर बब्रुवान गोरे, मानव अधिकार आंदोलन चे हनुमंत पाटुळे,अण्णासाहेब फरताडे, अंगद शिंदे,बाबुराव कवडे, हनुमंत रितापुरे, सरपंच सचिन कापसे, विजय जाधव, अमोल रितापुरे, रामहरी रीतापुरे, चक्रधर रीतापुरे, प्रतिक्र रितापुरे, बापू निंबाळकर, प्रशांत जाधव, यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

## हिललाइन पोलिसांची धडक कारवाई - गांजासह एक जण अटक

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२१, कल्याण (ठाणे) :** हिललाइन पोलीस ठाण्याच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे केलेल्या कारवाईत सुमारे ९९३ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून एक इसमाला अटक करण्यात आली आहे. पोहवा संदीप बर्वे यांना गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठांच्या आदेशानुसार सपोनि योगेश बेंडकुळे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने मलंगडवाडी बसस्टॉपजवळ पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट गाडीवर सापळा रचला. तपासात सदर गाडीतून १ लाख २० हजार रुपये किमतीचा ९९३ ग्रॅम गांजा आढळला. या प्रकरणी आरोपी शाहरुख उर्फ दाऊद अन्वर पठाण (वय २१ वर्षे) याला अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध हिललाइन पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ५४८/२०२५ नोंदविण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध NDPS कायदा कलम ८(क), २०(ब)(ii)(अ) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. ही कामगिरी सपोनि योगेश बेंडकुळे, पोहवा संदीप बर्वे, पोहवा अमीन तडवी, पोना नितीन पादिर, पोशि खरमाळे, सातपुते, तुषार गावडे व प्रशांत पाटिल यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. अंमली पदार्थ विरोधी मोहिमेत हिललाइन पोलिसांचे हे आणखी एक यश मानले जात आहे.

# २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान राज्यात पावसात वाढ होण्याची शक्यता

## शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठेवावीत

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२२, ठाणे :** २४ सप्टेंबरला बंगालच्या उपसागरावर एक कमी दाबाचा पट्टा निर्माण होणार असून २८ तारखेपर्यंत तो राज्यात येण्याची शक्यता आहे. या कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागांमध्ये २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान ढगाळ हवामान आणि पावसात वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

या आठवड्यात पाऊस परत सक्रिय होणार आहे. ज्यामुळे किमान ३० सप्टेंबरपर्यंत तरी राज्यातून पाऊस निरोप घेण्याची शक्यता नाही. सध्याच्या हवामानाच्या अंदाजानुसार २२ ते २५ सप्टेंबर दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये मेघ गर्जनेसह वादळी पाऊस अपेक्षित आहे, जो प्रामुख्याने दुपारनंतर पडेल. कमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव २६ तारखेपासून जाणवण्याची शक्यता आहे.

यादिवशी विदर्भ आणि मराठवाड्यातील पूर्व आणि दक्षिणेकडे असलेल्या भागांमध्ये दुपारनंतर पावसात वाढ होण्याची शक्यता आहे. २७ तारखेला विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये पावसात वाढ होऊ शकते, आणि यातील काही भागांमध्ये मुसळधार पाऊस देखील पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. २८ तारखेला राज्यातील पश्चिम भागांमध्ये पावसाचा




जोर कायम राहू शकतो. शेतकऱ्यांनी हवामानाच्या या अंदाजानुसार शेतीचे नियोजन करावे. काढणी केलेली पिके पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावीत, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

# चंद्रपूर जिल्ह्यात युरिया खत उपलब्ध करण्याचे आ.मुनगंटीवार यांचे निर्देश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** राज्याचे म ाजी वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून खत टंचाईची समस्या सुटणार असून शेतकऱ्यांपर्यंत वेळेत खत पोहोचावे यासाठी काटेकोर नियोजनाचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

शेती हंगामाच्या पार्श्वभूमीवर खत टंचाईची चिंता वाढली आहे. पण आमदार मुनगंटीवार यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.चंद्रपूर जिल्ह्यात (एचयुआरएल) कंपनीचे १२५० मेट्रिक टन आणि एनबीसीएल (नर्मदा) कंपनीचे



१६०० मेट्रिक टन युरिया खत लवकरच उपलब्ध होणार आहे. बल्लारपूरसह संपूर्ण जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन किसान मोर्चाच्या विनंतीनंतर आ. मुनगंटीवार यांनी त्यांच्या कार्यालयात खत उपलब्धतेबाबत महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली.

बैठकीला कृषी उपसंचालक चंद्रकांत ठाकरे, जिल्हा कृषी विकास अधिकारी वीरेंद्र राजपूत, उपविभागीय कृषी अधिकारी पवार, बल्लारपूरचे गुणनियंत्रक, तालुका कृषी अधिकारी गायकवाड, पोंभुर्णाचे गुणनियंत्रक तथा तालुका कृषी अधिकारी गवळी, चंद्रपूरच्या गुणनियंत्रक तथा तालुका कृषी अधिकारी गोडबोले, मूलच्या गुण नियंत्रण तथा तालुका कृषी अधिकारी गजभिये, भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बंडू गौरकार, भाजपा किसान महानगर मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष रवी चहारे आदींची उपस्थिती होती.

आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'युरिया खताचे वाटप काटेकोर नियोजनानुसार प्रत्येक कृषी केंद्रावर तसेच सर्व शेतकऱ्यांपर्यंत खत वेळेत पोहोचेल या दृष्टीने नियोजन करा. याशिवाय प्रशासनाच्या निर्देशांचे उल्लंघन करणाऱ्या वितरकांवर थेट एफ.आय. आर दाखल करावे.

दरम्यान, आजच्या तारखेस मूल तालुक्यात फक्त २.५ टन खत उपलब्ध असून पोंभुर्णा येथे एकही युरियाची बॅग उपलब्ध नाही, ही गंभीर बाब आहे.' शेतकऱ्यांच्या पिकांच्या हंगामी गरजा लक्षात घेता खत उपलब्धतेसाठी प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे निर्देश देखील त्यांनी बैठकीत दिले.

# ब्लॅक ड्रॅगन अकॅडमीचा मिशन आत्मसंरक्षण गौरव पुरस्कार २०२५ सोहळा संपन्न

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२२, खंडाळा (सातारा) :** सद्यस्थितीत वाढते अत्याचार, गुन्हेगारीकरण, गुन्ह्यांची क्रूरता याचा बिमोड करण्यासाठी स्त्रियांनी आत्मसंरक्षणची कौशल्ये जोपासणे अत्यावश्यक बनले आहे. हीच कौशल्य रुजविण्यासाठी ब्लॅक ड्रॅगन तायक्कांदो मार्शल आर्ट स्पोर्ट्स अँड फिटनेस अकॅडमीची स्थापना २०१८ झाली आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी २१ सप्टेंबर २०२५ रोजी कन्या शाळा वाई येथे मिशन आत्मसंरक्षण उपक्रम २०२३-२४ वर्षातील वाई-खंडाळा-महाबळेश्वर तालुक्यामधील शालेय मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिलेल्या विविध महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्कृष्ट स्वसंरक्षण मार्गदर्शक पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आले.

समारंभासाठी खंडाळा येथील सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, राज्यशास्त्र विभागात कार्यरत प्रा.अमीर इनामदार व जनता अर्बन को ऑपरेटिव्ह बँक वाई व्हाईस चेअरमन प्रा.शेखर फरांदे या दोन्ही प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन केले.यावेळी ब्लॅक ड्रॅगन स्पोर्ट्स अँड फिटनेस डेव्हलपमेंट असोसिएशन महाराष्ट्र संस्थापक-अध्यक्ष विशाल कुमठे,खजिनदार ओमकार राजेंद्र कांबळे,सचिव तुषार कुमठे कार्याध्यक्ष श्रीधर कदम,महाबळेश्वर तालुकाप्रमुख सुवर्णा रांजणे,विश्वस्त रोहन सतीश देशपांडे,शुभम कांबळे विशेष उपस्थिती होती. वाई तालुक्यातील वैष्णवी नवले,रिद्धी चिकणे,विद्या राजपुरे,श्रेया दाभाडे,तेजस्विनी जाधव,गौरी चौधरी,श्रावणी उंबरकर,वैष्णवी भोसले,प्रणाली महांगडे,तनुजा मांढरे सायली उंबरकर,मृदुला



गायकवाड,साक्षी पिसाळ,श्वेता सूर्यवंशी,शुभम कांबळे,रोहन देशपांडे,जिम्नॅस्टिक प्रशिक्षक मयुरेश सूर्यवंशी,अथर्व खरे,स्वप्निल पवार,मिशन आत्मसंरक्षण सपोर्टर संदीप धोत्रे,खंडाळा तालुका सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयातील समीक्षा भोसले,धनश्री गायकवाड, प्रेरणा क्षीरसागर,पायल पवार,ऋतुजा गार्डे,अक्षय देशमाने,साहिल शिंदे,यश शेडगे या विद्यार्थ्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. यासोबत विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे ब्लॅक ड्रॅगन अकॅडमीची विद्यार्थिनी मंजुषा गायकवाड हीने कराटे क्रीडा प्रकारात वर्ष २०१८ ते २०२५ सातत्यपूर्ण प्रयत्न करत अकॅडमीची सातारा जिल्ह्यातील प्रथम ब्लॅक बेल्ट मिळवणारी सुवर्णकन्या म्हणून तिचा सहकुटुंब विशेष गौरव करण्यात आला.

# शेतातील केळी शेतकऱ्यांनी जनावरांना घेतल्या खाऊ

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२२, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यांत फुलं उत्पादनानंतर केळीचे उत्पादनही बऱ्याच प्रमाणात घेतले जाते परंतू परिसरातील व्यापाऱ्यांकडून केळीचे दर ६०० रुपये प्रतिक्विंटल पर्यंत घेऊन शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा घाट घातला जात असल्याने परिसरातील शेतकरी केळी जनावरांना खाऊ घालत आहेत. नांदेड जिल्ह्यातील मुदखेड व अर्धापूर या दोन तालुक्यांत केळीचे म ोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते.

परंतू गेल्या तीन महिन्यांपूर्वी प्रतिक्विंटल २ हजार रुपये दराने केळी व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून खरेदी केली पावसाळ्यात मात्र केळीचे दर मात्र ४०० ते ६०० रुपये प्रतिक्विंटल वर आला असून या दरामध्ये केळीचा लागवडीपासूनचा खर्च ही निघत नसल्याने शेतकरी व्यापाऱ्यांच्या मनमानीमुळे पार मेटाकुटीला आला आहे केळीचे दर २ हजारांवर असताना ४० ते ५० रुपये डझन प्रमाणे विक्री होत परंतू ४०० ते ६०० रुपये दर असताना केळी १० ते १५ रुपये डझन प्रमाणे विक्री करणे आवश्यक असताना ३० रुपये प्रमाणे विक्री करण्यात येत आहेत देशभरात मान्सून जोरदारपणे बरसत आहे.

हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, उत्तरप्रदेश आदी भागात केळीला प्रचंड प्रमाणात मागणी असल्याने दर जास्त होते गेल्या दीड दोन महिन्यांपासून अतिवृष्टीमुळे उत्तरेकडील राज्यांत भयंकर पाऊस झाल्याने जगणे अवघड

> मुदखेड तालुक्यात केळीची लागवड बऱ्याच प्रमाणात करण्यात येते साधारण दोन महिन्यांपूर्वी केळीला २ हजार २०० रुपये प्रमाणे दर मिळाला आता ६०० रुपयांचा दर देत आहेत शेतकऱ्यांना शेतातून रस्त्यावर केळीचे घड आणून टाकने परवडत नाही त्यामुळे शेतकरी फुकट हमाली न करता आपल्या गुरांना केळी टाकत आहेत.
>
> **नवनाथ सावंत (केळी उत्पादक शेतकरी, मुदखेड)**

झाले वाहतूक जवळपास बंद असल्याने आपल्या भागातील केळी तिकडे जाणे बंद असल्याने मागणी शुन्य झाली आहे परिणामी केळीचे दर घसरले आहेत.

एकीकडे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिके पाण्याखाली गेली अन् आता केळी व्यापारी केळी खरेदी करत नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे शेतातून रस्त्यावर केळीचे एक घड आणण्यासाठी १५ ते २० रुपयांचा खर्च येत असून वर्षभर केळीचे संगोपन करुन एका घडाचे ५० रुपयेच पदरी पडत असल्याने केळीचा लागवडीपासूनचा खर्च ही निघत नाही उलट घरातूनच पैसे द्यावे लागत आहेत त्यामुळे नाईलाजाने केळी जनावरांना टाकावी लागत आहे.केळी व्यापारी यांचेशी चर्चा केली असता बाजारात सिताफळ आले असल्याने केळीला मागणी कमी झाली असल्याचे नाव न घेण्याच्या अटीवर माहिती दिली.

## माहिती तंत्रज्ञान विभागाचे सक्षमीकरण करणार - मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२२, ठाणे :** सामान्य प्रशासन विभागात माहिती तंत्रज्ञान हा महत्वाचा विभाग आहे. राज्य शासनाच्या विविध विभागाच्या सेवा या विभागामार्फत नागरिकांना पुरविल्या जातात. त्याम ुळे आता माहिती तंत्रज्ञान विभागाचे सक्षमीकरण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली माहिती तंत्रज्ञान विभागाची आढावा बैठक झाली.

या बैठकीस मुख्य सचिव राजेशकुम ार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही.राधा, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील माहिती तंत्रज्ञान विभागाचे सक्षमीकरण करून डिजिटल महाराष्ट्राची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा शासनाचा निर्धार आहे. शासनाच्या सर्व सेवांना डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देणे, कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि सायबर सुरक्षा यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे हे शासनाचे प्राधान्य असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# हिवरे कोरडा येथे नवरात्र उत्सवास प्रारंभ


**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील हिवरे कोरडा गावाचा नवरात्र उत्सव म्हटला की सर्वात पहिले नाव येते ते मळगंगा देवी. गावाच्या मध्यभागी असलेले हे मंदिर श्रद्धेचे केंद्र असून पिढ्यान्पिढ्या गावकरी आणि परिसरातील भाविक येथे दरवर्षी दर्शनासाठी येतात.

परंपरेनुसार, शेकडो वर्षांपूर्वी गावकऱ्यांच्या स्वप्नात देवीने दर्शन दिले आणि येथे मंदिर उभारण्याची प्रेरणा मिळाल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. तेव्हापासून मळगंगा देवी गावाची जागृत ग्रामदैवत मानली जाते. शेतकरी वर्ग विशेषतः देवीला नवस करतो. पिकाला पाणी मिळावे, गुरांचे रक्षण व्हावे किंवा घरातील संकटे दूर व्हावे. यासाठी देवीकडे आर्जव केले जाते.

नवरात्राच्या पहिल्याच दिवशी मंदिरात घटस्थापना होऊन भक्तिभावाचे वातावरण निर्माण होते. ९ दिवस अखंड आरत्या, कीर्तन, भजनी मंडळे, जगर-गोंधळाने मंदिर परिसर दुमदुमून जातो. देवीची पालखी मिरवणूक गावातून निघते, यावेळी डफ-ताशांचा निनाद, झेंड्यांची रांगोळी आणि भक्तांची गर्दी गावाला उत्साहाने भारून टाकते.

संध्याकाळच्या वेळी होणारी महाआरती ही भक्तांना अध्यात्मिक अनुभव देते. रात्री गावातील व बाहेरगावच्या मंडळांचे भजन-कीर्तन होऊन भक्तीचा झंकार झोपू देत नाही.



**नवसाला पावणारी हिवरे कोरडा येथील मळगंगा देवी**

### चमत्कार व श्रद्धा

गावकऱ्यांच्या सांगण्याप्रमाणे अनेक संकटांतून देवीने संरक्षण दिल्याच्या कथा आख्यायिका प्रचलित आहेत. दुष्काळी काळात पावसासाठी केलेल्या नवसाने पाऊस झाल्याचे, रुग्ण बरे झाल्याचे अनुभवांची लोक आख्यायिका सांगतात. त्यामुळेच मळगंगा देवी नवसाला पावणारी जागृत दैवत अशी ओळख मिळाली आहे.

### सामाजिक एकतेचे केंद्र

नवरात्र हा उत्सव केवळ धार्मिकतेपुरता मर्यादित न राहता गावातील सामाजिक ऐक्याचा सेतू ठरतो. बाहेरगावचे भाविक या दिवसात आवर्जून गावात एकत्र येतात. गावात स्वच्छता, आरोग्य शिबिरे व विविध उपक्रम राबवून उत्सव अधिक अर्थपूर्ण बनवला जातो.

### प्रेरणा व संदेश

मळगंगा देवीची उपासना ही भक्तांसाठी धैर्य, परिश्रम आणि समाजहिताची प्रेरणा आहे. नवरात्र म्हणजे श्रद्धा, एकात्मता आणि संस्कृतीचे जतन करणारा उत्सव- हाच मळगंगा देवीच्या नवरात्र उत्सव सोहळ्यातून उमजते.

# मुख्यमंत्री पाटणकर यांना ताकद देणार - मंत्री जयकुमार गोरे

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२१, पाटण (सातारा) :** आज देशातील सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपा पक्षाकडे पाहिले जाते. पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वाखाली भारत देश विकासाच्या उंच शिखरावर पुढे पुढे जात आहे. प्रत्येकाला आपला पक्ष मोठा करण्याचा अधिकार आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आपल्यासोबत आहेत. त्यामुळे तुम्ही अजिबात चिंता करू नका. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक ताकदीने लढा. भाजप आपल्याला निश्चितच ताकद देईल. पाटणकरसाहेब आपल्यावर येथील लोकांचा मोठा विश्वास असून आपले मोठे संघटन आहे. जेव्हा गरज पडेल तेव्हा मी आपल्या पाठीशी ठामपणे उभे आहे. रात्री-अपरात्री केव्हाही फोन करा मी सदैव तयार आहे, असा ठाम विश्वास राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी कोयनानगर येथे बोलताना दिला.

कोयनानगर येथे आयोजित केलेल्या रानभाजी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्याचे माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रम सिंह पाटणकर होते. यावेळी भाजपा नेते व सातारा जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, युवा नेते याज्ञसेन पाटणकर, सागर शिवदास हिंदूराव पाटील, राजाभाऊ शेलार, विक्रमबाबा पाटणकर, पाटणच्या नगराध्यक्षा अनिता देवकांत, उपनगराध्यक्ष सचिन कुंभार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी ना. गोरे यांच्या हस्ते रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

ना.जयकुमार गोरे पुढे म्हणाले, माझ्या आयुष्यातील हा पहिलाच रानभाजी महोत्सव पाहिला आहे. येथे भाजीला कोणते औषध नाही. नैसर्गिक वातावरणात, शुद्ध हवेत या रानभाज्या येतात. या भागाला विकासाची दिशा देणारे ही विक्रमसिंह पाटणकर आहेत. दुर्गम भागातील जनतेसाठी दादा हे एक चांगले नेतृत्व आहेत. या भागात सर्वांगीण विकासासाठी सन्मानाची भूमिका घेतलेल्या पाटणकरांसोबत काम करण्याची घेण्याची मला संधी लाभली. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी मला काम करण्याची संधी दिली त्या भाजपा पक्षाच्या कार्यकर्त्याला ताकद देणे हे माझे कर्तव्य आहे. पाटण तालुक्यातील लोकांचे आमच्यावर फार मोठे उपकार आहेत. येथे धरणे झाली आणि पाणी अडवले नसते तर आम्हाला पाणी मिळाले नसते. माझा लढा पाण्यासाठीच होता. आमचा दुष्काळी भाग होता पण तुमच्या आशिर्वादाने आज आमच्या तालुक्यात ऊस घेतला जातो. राजकारणात सोबत घेऊन जावे लागते. योग्य ठिकाणी तुम्ही आला आहात. आता योग्य सन्मान होईल. कालचक्र असते. येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समितीत ताकदीने लढुयात. तुम्ही माझे भाऊ आहात. ज्याला त्याला स्वतःचा पक्ष वाढवायचा असतो. आपण आपला पक्ष वाढवा, असे त्यांनी सांगितले.

विक्रमसिंह पाटणकर म्हणाले, रानभाज्या आणि आपल्या स्थानिक गोष्टींसाठी आपण बाजारपेठ उपलब्ध करु. आपल्या स्थानिक गोष्टींना आपण जगासमोर आणले पाहिजे. आपल्या शरीरात चांगले अन्न गेले तर आपले आरोग्य चांगले राहिल. भविष्यात विषमुक्त शेतीकडे लक्ष देवून मार्टेकिंगचा प्रश्न सोडवायचा आहे, असे सांगून ते म्हणाले, आपण पूरक असा निर्णय घेतला. भाजपची ताकद आपल्यासोबत आहे. निर्भीडपणे कार्यकर्त्यांनी काम करा. पक्ष आपल्या पाठीशी उभा आहे आपण ही पक्षाचे ताकदीने काम करा. भाऊंच्या पाठिंब्यामुळे आमची ताकद वाढली आहे. सर्वांनी एकदिलाने काम करूयात, असे त्यांनी सांगितले.

सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले, गेलेली सत्ता परत आणणे आम्हाला नवीन नाही. सत्ता घेणे काय अवघड नाही. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक विधानसभा पेक्षा वेगळी आहे. तालुक्याचा सर्वांगीण विकास विक्रमसिंह पाटणकर यांनी केला. विक्रमसिंह पाटणकर हे आमदार झाले तेव्हा तालुका मागासलेला होता. २५० वाड्यांना लाईट, शाळा नव्हती. महसूल गावे, घाट फोडून रस्ते करणे, दहावी पास शिक्षक, शैक्षणिक संस्था अशी अनेक कामे विक्रमसिंह पाटणकर यांनी केली. रोजगाराच्या संधी आपण तालुक्यात आणल्या. पर्यटक आले पाहिजे म्हणून बोट आणली. कोयनानगर एक परिपूर्ण शहर म्हणून पाहिले जात होते. मात्र पराभवानंतर आम्ही सुरु केलेली बोट सुरक्षिततेच्या कारणास्तव बंद केली. आम्ही कोयनेत सुरु केलेल्या अनेक गोष्टी बंद केल्या. मासेमारी बंद केली. उर्जा पार्कसाठी मंजूर केलेले पैसे काही लोकांनी घालवले आणि पोलिस प्रशिक्षण केंद्र इकडे आणले. पठारावर असलेली २० टक्के लोक गावात राहिली. येथील पर्यटन वाढले, लोक आले की स्थानिक लोक पुन्हा स्वगृही येतील. आपले पर्यटक मंत्री पर्यटन मरळीला घेऊन जात आहेत. बोटिंग फक्त तीन दिवस चालले. नावाला पर्यटनमंत्री फक्त. यांची जबाबदारी काय? पर्यटनाचे कार्यक्रम घेतात महाबळेश्वरला. पाटण विधानसभा मतदारसंघाची खरी ताकद जि.प.पं.समितीत आहे. कमळाच्या चिन्हावरती आपण आपले सरकार आणायचे आहे. ज्या घरात प्रवेश केलाय तिथेच आता नांदायचेच आहे. लढायची आता जिंकण्यासाठी करायची असल्याचे त्यांनी सांगितले.




**कराड-चिपळूण रस्त्याबाबत नाराजी गेल्या ७ वर्षापासून कोयनेच्या रस्त्याचे काम सुरूच आहे. आताची परिस्थिती पाहता अजून ७ वर्षे हे काम पूर्ण होईल असे वाटत नाही, अशी खंत व्यक्त करत आपण याबाबत पालकमंत्री यांच्याशी बोलून असे त्यांनी सांगितले.**

विक्रमबाबा पाटणकर म्हणाले, दुर्गम तालुका म्हणून पाटणकडे पाहिले जाते. मात्र हा दुर्गम शब्द बदलण्याचा प्रयत्न विक्रमसिंह पाटणकर यांनी केला. सन २०१६ पर्यंत तालुक्याची घडी व्यवस्थित होती. सध्या तालुका तसा राहिला नाही. पर्यटनाच्याबाबत शासनाने विक्रमसिंह पाटणकर यांना विचारात घेतले पाहिजे. त्यांच्या स्वप्नातील पर्यटन तालुका घडला तर एक आदर्शवत ठरेल. आता भाजपची व्याप्ती तालुक्यात वाढली आहे. आमचा कोणावर रोष नाही. विकासाची कामे आली मात्र त्यात पन्नास टक्के वाटा भाजपचा आहे. सदोष दृष्टीने विकास दिसत नाही. ठेकेदारांसाठी रस्ते ही संकल्पना चालली आहे. डोंगरावरचा माणूस आम्ही खाली आणला, असे त्यांनी सांगितले.

यावेळी राजाभाऊ शेलार, भाजपा तालुकाध्यक्ष नंदकुमार सुर्वे यांनी मनोगत व्यक्त केले. दरम्यान यावेळी राजाभाऊ शेलार यांचा वाढदिवसानिमित्त ना. गोरेंच्या हस्ते यथोजित सत्कार करण्यात आला. सत्यजित शेलार यांनी प्रास्ताविक केले. मनोहर यादव यांनी सूत्रसंचालन केले. बाळा कदम यांनी आभार मानले. कार्यक्रमास दीपकसिंह पाटणकर, ॲड. अविनाश जानुगडे, सुभाषराव पवार, बाळासाहेब राजेमहाडिक, रवी पाटील, चंद्रकांत भिसे, गणेश यादव, फत्तेसिंह पाटणकर, दिनकरराव घाडगे, रामभाऊ साळुंखे, अधिक माने, शशिकांत पाटील, रंगराव जाधव, वाय. के. घाडगे, धैर्यशील पाटणकर, रामभाऊ मोरे, नथुराम मोरे, धोंडीराम ताटे, लक्ष्मण झोरे, जगन्नाथ शेळके, स्नेहल जाधव, पूजा कदम, बबनराव कांबळे, पंकज गुरव, बाळासाहेब कदम, संजय पाटील, रोहिणी पाटील, गीतांजली काळे, मिलन सय्यद व कोयना विभातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाटण मध्ये दुर्गा मातेचे उत्साहात प्रतिष्ठापना

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२२, पाटण (सातारा) :** दुर्गा माता की जय, अंबे माता की जयच्या घोषणा देत फटाक्याची आतषबाजी करत ढोल ताशाच्या गजरात भक्तिमय वातावरणात वाजत गाजत दुर्गा मातेचे आगमन झाले. तर दिनांक २२ सप्टेंबर २०२५ सकाळपासून पावसाने उघडीप दिली होती. दुपारी चार नंतर पावसाने दमदार सुरुवात केल्याने भक्तांची तारांबळ उडाली होती. तरीपण दुर्गामाता प्रतिष्ठापना करण्यासाठी नेताना दुर्गामाता भक्तांचा उत्साह मोठ्या प्रमाणात दिसत होता.

पाटण शहरासह तालुक्यातील विविध दुर्गा उत्सव मंडळांनी सोमवारी घटस्थापनेदिवशी दुर्गामातेच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून नवरात्र उत्सवास सुरूवात केली. पाटण शहराची ग्रामदेवता श्री लक्ष्मी आई देवीची सकाळी ७ वाजता विधिवत पूजाअर्चा करून प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यामुळे दिवसभर मंदिरात देवीच्या दर्शन घेण्यासाठी भाविकांनी कर्दी केली होती तर दिनांक २२ सप्टेंबर २०२५ सकाळपासूनच खेडोपाड्यातील विविध मंडळाचे कार्यकर्ते ढोल, ताशे लेझीम फटाक्याची आतषबाजी करत व पारंपारिक वाद्याने दुर्गा मातेची मूर्ती नेण्यासाठी पाटण शहरातील कुंभारवाड्यात दाखल झाले होते.

अगदी लहान चिमुकल्यांपासून ते अबाल वृध्द, महिला, युवक, युवती दुर्गामातेची मूर्ती नेण्यासाठी शहरात दाखल झाले होते. येथील स्वामी मंदिरातील शिवाजी उदय मंडळ पाटण, समाज सेवा मंडळ , प्रताप सेवा मंडळ, जयभवानी नवरात्र उत्सव मंडळ, अष्टगंध सेवा मंडळ, शिवलिंग गणेश मंडळ, कुंभारवाड्यातील गजानन सेवा मंडळ, नवी पेठ येथील रणजीत सेवा मंडळ, चाफोली रोड येथील जयभारत मंडळ, श्रीराम मंडळ रामापूर, आदी मंडळांनी आनंदात उत्साहपूर्ण वातावरणात दुर्गा मातेच्या मुर्तींची विधिवत प्रतिष्ठापना केली.

# थोडक्यात

## वाढवण बंदर प्रकल्प ग्रीनफिल्ड महामार्ग बाधित शेतकरी आक्रमक
## प्रशासना विरोधात संताप व्यक्त



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२२, पालघर :** पालघर जिल्ह्यातील वाढवण या महाकाय बंदर प्रकल्प उभारणीला मोठा वेग मिळत आहे. या बंदराला अनेक अंतर्गत महामार्ग जोडणाऱ्या ग्रीनफिल्ड महामार्ग निर्मितीची प्रक्रिया सुरु झाली आहे. तवा (डहाणू) येथील मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गापासून वाढवण बंदरापर्यंत तब्बल ३२ किलोमीटर लांबीचा आठ पदरी महामार्ग तयार होणार आहे. या महामार्गामुळे तवा, कोल्हाण, धामटणे, आंबेदे, नानिवली, आकेगव्हाण, आकोली, रावते, चिंचारे, गारगाव, शिरगांव आदी गावांतील हजारो शेतकऱ्यांची जमीन संपादित केली जाणार आहे.

मात्र भुसंपादन प्रक्रियेमध्ये शेतकऱ्यांना विश्वासात न घेता महसूल विभागाकडून जबरदस्तीने जमिनीची मोजणी केली जात असल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यात महसूल विभागाने कोणतीही लेखी नोटीस न देता फेरफार केल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट आहे. त्यातच फळझाडे, औषधी व वनझाडे, तलाव, बोरवेल, तसेच पक्की व कच्ची घरे यांची कोणतीही योग्य नोंद न घेता भुसंपादनाची प्रक्रिया रेटली जात आहे.

यासंदर्भात बाधित शेतकऱ्यांनी काही दिवसांपूर्वी जिल्हाधिकाऱ्यांना लेखी तक्रार सादर केली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक बोलावण्यात आली होती. मात्र या बैठकीस जिल्हाधिकारी स्वतः गैरहजर राहिल्याने फक्त निवासी जिल्हाधिकारी उपस्थित होते. परिणामी शेतकऱ्यांच्या मागण्यांना समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, प्रकल्पाच्या नावाखाली जबरदस्तीने जमीन हिसकावून घेतली जात आहे. आम्हाला न्याय्य मोबदला, कायमस्वरूपी रोजगार आणि प्रकल्प बाधित दर्जा मिळाल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही, असा इशारा शेतकरी संघटनांनी दिला आहे. यामुळे आगामी काळात वाढवण बंदर प्रकल्प व ग्रीनफिल्ड महामार्गाच्या कामावर शेतकऱ्यांचा आक्रोश व संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

## के.रामलू शाळेच्या ३ विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२२, कुंडलवाडी (नांदेड) :** सगरोळीत पार पडल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील के. रामलू शाळेच्या विद्यार्थ्यांनी तालुका स्तरीय कुस्ती स्पर्धेत घवघवीत यश मिळवले. दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी सगरोळी येथील छत्रपती शिवाजी हायस्कूल मैदानावर पार पडलेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत १७ वर्षांखालील गटात ५५ किलो वजन गटात करण विजय दावलबाजे याने प्रथम, १४वर्षा खालील ५० किलो वजन गटात साईनाथ भारत मानेवार प्रथम तसेच १४ वर्षाखालील ६२ किलो वजन गटात मुलींमध्ये अक्षरा शंकर नीलपवार या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक पटकावला. या सर्व विद्यार्थ्याने तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला. हे विद्यार्थी खेळाडू जिल्हा स्तरासाठी पात्र ठरले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार, सचिव यशवंत संगमवार,संचालिका रमा ठक्कुरवार, प्रिंसिपल जे.संभाजी, व्हाय प्रिंसिपल एम.सपना यांनी अभिनंदन केले. पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक कासलोड, शिक्षिका नरोड अर्चना यांचे मार्गदर्शन लाभले.

## वासुंदे सेवा सोसायटीतर्फे कर्जदार सभासदांचा मोफत विमा
## सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते शुभारंभ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२,पारनेर (अहिल्यानगर) :** वासुंदे सेवा सोसायटीच्या वतीने कर्जदार सभासदांसाठी प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत मोफत विमा काढण्यात आला. या योजनेचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी माजी उपसरपंच शंकर बर्वे, सोसायटीचे चेअरमन सूर्यभान भालेकर, व्हा.चेअरमन लक्ष्मण झावरे, शरदराव पाटील, माजी चेअरमन नारायण झावरे, पो. मा.झावरे, बापूसाहेब गायखे, विकास झावरे, बाळासाहेब वाबळे, रा.बा.झावरे, पोपट हिंगडे, बाळासाहेब झावरे, नाना वाबळे, दिलीप पाटोळे, पी.डी.बर्वे, मारुती उगले, सेवा सोसायटीचे सचिव दत्तात्रय बांडे व श्री.भांड तसेच ग्रामविकास अधिकारी भास्कर लोंढे आदी उपस्थित होते.

या योजनेमुळे कर्जदार सभासदांना आर्थिक सुरक्षितता मिळणार असून, अपघातजन्य परिस्थितीत त्यांच्या कुटुंबाला विम्याचा लाभ मिळेल. सुजित झावरे पाटील यांनी यावेळी बोलताना सोसायटीच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले आणि अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होत असल्याचे सांगितले. चेअरमन सूर्यभान भालेकर यांनी सांगितले की, सभासदांच्या कल्याणासाठी सोसायटी नेहमीच प्रयत्नशील आहे आणि भविष्यातही असे उपक्रम राबवले जातील. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी सभासदांना या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. सोसायटीच्या या सामाजिक पुढाकाराने गावातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. या योजनेमुळे कर्जदार सभासदांना आर्थिक संरक्षण मिळणार असून, त्यांच्या कुटुंबाच्या भविष्याची चिंता कमी होण्यास मदत होईल. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोसायटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.